# नाशिक महानगरपालिका, नाशिक

(झोपडपट्टी सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास अधिनियम १९७१ च्या कलम ४ अन्वये)

## जाहीर नोटीस

नाशिक महानगरपालिका हद्दीतील ज्या झोपडपट्ट्या मध्ये अत्यंत दाटवस्ती, चुकीची व सदोष पद्धतीने घरे/झोपडे, अत्यंत अरुंद सदोष बोळ रस्ते, अपुरा प्रकाश, नैसर्गिक विधीची अपुरी साधने अशी अवस्था असून तेथील नागरिकांच्या आरोग्यास धोका पोहोचण्याचा संभव आहे अश्या झोपडपट्ट्यांमध्ये नागरी सुविधा देण्याचा महापालिकेचा मनोदय आहे.

तथापि सदरच्या झोपडपट्ट्यां मधील रहिवाशांना / झोपडीधारकांना / घरमालकांना / जागा जमीनमालकांना / अगर ज्याचे हितसंबंध प्रस्तापित असतील अशा इसमांना सदरहू जाहीर नोटिसीने जाहीर करण्यात येते, की नाशिक महानगरपालिकेने खालील नमुद झोपडपट्ट्यां ही झोपडपट्टी सुधारणा कायद्याप्रमाणे घोषित करण्याचे ठरविले आहे.

सबब सदर झोपडपट्ट्यां झोपडपट्टी सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास अधिनियम १९७१ च्या कलम ४ अन्वये घोषित करणेकामी कोणाची हरकती असल्यास सदरहू नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **१५** दिवसाच्या आत महापालिकेच्या कार्यालयात लेखी सूचना अर्जाद्वारे कळवाव्यात व त्याची पोहोच घ्यावी.

सदरहू जाहीर नोटिशीने मुदतीत कोणाचीही तक्रार अथवा हरकती न आल्यास सदरच्या झोपडपट्ट्यां ह्या झोपडपट्टी सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास अधिनियम १९७१ च्या कलम ४ अन्वये घोषित करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

घोषित करावयाच्या झोपडपट्ट्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१. झोपडपट्टीचे नाव - शिवाजीवाडी नंदिनी नगर/भारत नगर
   - क्षेत्रफळ - ७.१० हे.आर
   - सर्व्हे नं. ८०९
   - जागा मालकी - नाशिक महानगरपालिका, नाशिक
   - चर्तु:सिमा -

     पुर्व - १८ मी. विकास योजना रस्ता - वडाळा पाथर्डी रोड व त्यालगत नाशिक शिवार सर्व्हे नं. ८१० (पै.)
     पश्चिम - नाशिक शिवार सर्व्हे नं. ८०८ (पै.) मनपा बी.एस.यु.पी.घरकुल योजना
     उत्तर - नाशिक शिवार सर्व्हे नं. ८६६ (पै.)
     दक्षिण - नंदिनी [नासर्डी] नदी

२. झोपडपट्टीचे नाव - कस्तुरबा नगर
   - क्षेत्रफळ - १३६२२.०० चौ.मी.
   - सर्व्हे नं. ६४८/ब२
   - जागा मालकी - नाशिक महानगरपालिका, नाशिक
   - चर्तु:सिमा -

     पुर्व - अ. भु. क्र. २६०, २६१, २५७ न. र. यो. क्र. २
     पश्चिम - अ. भु. क्र. ३४८,३४९,३५०,३५१ न. र. यो. क्र. २
     उत्तर - अ. भु. क्र. ३५१ अ मधील उद्यान आरक्षित क्षेत्र
     दक्षिण - अ. भु. क्र. ३५३ न. र. यो. क्र. २

सविस्तर तपशील दाखविणारा नकाशा झोपडपट्टी सुधारणा विभाग, मुख्यालय, राजीव गांधी भवन, नाशिक महानगरपालिका, नाशिक येथे कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवसखेरीज करून पाहावयास मिळेल.

उप आयुक्त तथा सक्षम अधिकारी
नाशिक महानगरपालिका, नाशिक
जावक क्र.        /२०२४-२५

सही/-
आयुक्त तथा प्रशासक
नाशिक महानगरपालिका, नाशिक